॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## ई-निविदा सूचना

कबचौउमविच्या परीक्षा विभागात **'वापरलेल्या उत्तर पत्रिका व कालबाह्य कागदपत्रांची (रद्दी) विक्री बाबतची'** ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्यासाठीची अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करावयची आहे. सदरची निविदा सूचना व निविदा विद्यापीठाच्या **Website: www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**परिपूर्ण भरलेली ऑनलाईन स्वरूपातील ई-निविदा दि.२३/१२/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** जमा करावी. सदरची ई-निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमित केल्यास त्या संबंधीची सूचना वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जाक्रं.: कबचौउमवि/ई-निविदा/परीक्षा/२९८७/२०२२

दिनांक : ०२ /१२/२०२२

**प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.


**पत्र पेटी क्र.८० उमविनगर, जळगाव**

**दूरध्वनी क्र.(०२५७) २२५७३०६**

**फॅक्स नं. (०२५७) २२५७४०७**

**www.nmu.ac.in**


## वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची विक्रीची

## ई-निविदा

जा.क्र. कबचौउमवि/ई-निविदा /परीक्षा/वा.उ.विक्रीची ई-निविदा/२९८७/२०२२
दि.०२/१२/२०२२

**अधिक माहितीसाठी कृपया https://mahatenders.gov.in आणि**

**www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.**

**एकूण पाने ०१ ते १३**

निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक :२३/१२/२०२२

निविदा किंमत रु.१५,०००/-

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

Grade-A
NAAC ACCREDITED IVth cycle

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

## ⭘ अनुक्रमणिका ⭘

## वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची विक्रीची ई-निविदा


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 01 | ई-निविदा प्रसिध्द करण्याचे वेळापत्रक व संपर्क तपशील | 03 |
| 02 | ई-निविदा सुचना | 04 |
| 03 | ई-निविदा भरण्यासाठी सूचना | 05 ते 06 |
| 04 | ई-निविदेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती | 07 ते 08 |
| 05 | वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची अंदाजे वजननिहाय माहिती तक्ता | 09 |
| 05 | निविदाधारकाची माहिती **परिशिष्ट -1** | 10 |
| 06 | मागील तीन वर्षाच्या वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र **परिशिष्ट-2** | 11 |
| 07 | ई-निविदेत भाग घेण्यासाठी काळया यादीत टाकण्यासंदर्भात प्रतिबंधित करण्यासंदर्भातील रु.200/- च्या स्टॅम्प पेपरवरील घोषणा पत्र **परिशिष्ट -3** | 12 |
| 08 | ई-निविदाधारकाचे घोषणा पत्र **परिशिष्ट -4** | 13 |

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

Grade-A
NAAC ACCREDITED IV Cycle

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
## निविदेचे वेळापत्रक आणि संपर्क तपशिल

# वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची विक्रीची

# ई-निविदा

| अ.क्र. | तपशील | सुरुवात दिनांक आणि वेळ | अंतिम दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|
| ०१ | ई-निविदा प्रसिध्दीची तारीख | ०३/१२/२०२२ ११.०० am | -- |
| ०२ | निविदा डाऊनलोड करण्याची सुरवातीची तारीख | ०३/१२/२०२२ ११.०५ am | २३/१२/२०२२ ०५.०० pm |
| ०३ | निविदा भरण्याची सुरवातीची तारीख | ०३/१२/२०२२ ११.०५ am | २३/१२/२०२२ ०५.०० pm. |
| ०४ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | २३/१२/२०२२ ०५.०० pm. | -- |
| ०५ | निविदा उघडण्याची तारीख (शक्य झाल्यास) | २६/१२/२०२२ ०३.०० pm | -- |

### निविदा विषयक चौकशीसाठी संपर्क

श्री.सुमीत काटकर : ७७४५८२७३८५
निविदाविषयक माहिती तथा सादरीकरणाबाबतच्या अडचणी संदर्भात (NIC प्रतिनिधी) : ७८४३०२४९१०

१) प्रा.डॉ.डी.एस.दलाल,प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ : ०२५७-२२५७३०१/३०२
२) श्री.अनिल आर.वाणी : ०२५७-२२५७३०६
३) श्री.सोपान शालीक पाटील, सहायक : ०२५७-२२५७३०७

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

Grade-A
NAAC ACCREDITED IVth cycle

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

==============================================================

## ई-निविदा सूचना

कबचौउमविच्या परीक्षा विभागात "वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची विक्री बाबतची" ई-निविदा मागविण्यात येत आहे. त्यासाठीच्या अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर वर ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाची आहे. सदरची निविदा सूचना व निविदा विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर फक्त माहितीसाठी उपलब्ध आहे.

सदरची परिपूर्ण भरलेली ऑनलाईन स्वरुपातील ई-निविदा दि.२३/१२/२०२२ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत जमा करावी. सदरची ई-निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमीत केल्यास त्यासंबधीची सूचना वरील संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात येईल.

जा.क्र. कबचौउमवि/ई-निविदा /परीक्षा/वा.उ.विक्रीची ई-निविदा/२९८७/२०२२
ठिकाण :- जळगाव
दिनांक :- ०२/१२/२०२२

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
कबचौउमवि,जळगाव

## : ई-निविदा भरण्यासाठी सूचना :

प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची विक्रीसाठी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेनुसार पंजीकृत निविदाधारकांकडून खालील तपशीलानुसार ई-निविदा मागविण्यात येत आहेत :-

1. **ऑनलाईन निविदा सादर करण्याची प्रक्रिया** :- सर्व पात्र /निविदाधारकांनी http://mahatenders.gov.in Online या पोर्टलवर नोंदणी करुन ऑनलाईन ई-निविदा सादर करणे आवश्यक आहे. ई-निविदा दस्तऐवजांचे तांत्रिक भाग (Technical Document)व दरांचा भाग (Price Bid) अशा दोन भागात निविदा सादर करावयाची आहे. (खरेदीदार विद्यापीठ विवादीत प्रकरणी ई-निविदा भरण्यासाठी पात्र नाहीत, याची नोंद घ्यावी.)
2. **तांत्रिक भाग** : तांत्रिक भागामध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असेल. खरेदीदाराने या सर्व कागदपत्रांची स्कॅन कॉपी ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. सर्व दस्तऐवज हे वैध असणे आवश्यक आहे. आणि निविदाधारकाने स्वतः प्रमाणित केले पाहिजे. खालील नमूद केलेले दस्तऐवज सादर न केल्यास निविदा नाकारली जावू शकते.

| अ.क्र. | दस्तऐवजाचे नाव |
|---|---|
| ०१ | निविदाधारकाची संपूर्ण माहिती **परिशिष्ट -१** |
| ०२ | संस्थेचे नोंदणीचे प्रमाणपत्र |
| ०३ | सेवा कर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (GST Certificate) |
| ०४ | पॅन कार्डाची प्रत (Pan Card)M. |
| ०५ | मागील तीन आर्थिक वर्षाच्या दाखल केलेल्या प्राप्तीकर विवरणाच्या प्रती **परिशिष्ट -२**<br>(२०१९-२०, २०२०-२०२१,२०२१-२०२२) (Annual Turnover) |
| ०६ | मागील तीन आर्थिक वर्षातील वार्षिक उलाढालीचा पुरवा.<br>(२०१९-२०, २०२०-२०२१,२०२१-२०२२) |
| ०७ | निविदाधारकाला कोणत्याही (केंद्र / राज्यशासनाने) सरकारी खात्याने /सरकारने अन्य वा शासन अनुदान पात्र कोणत्याही एजन्सीने संस्थेने कधीही काळया यादीत टाकलेले नाही अशा आशयाचे रु.२००/-च्या स्टॅम्प पेपरवरील नोंटरी करुन दिलेले प्रतिज्ञापत्र सादर करावे. **परिशिष्ट -३** |
| ०८ | निविदाधारकाच्या लेटरहेडवरील घोषणापत्र **परिशिष्ट -४** |
| ०९ | इंटरनेट बँकींगव्दारा भरलेल्या निविदेची किंमत आणि बयाणा रक्कमेच्या पावत्या. |
| १० | **निविदेचा स्वाक्षांकित केलेला संपूर्ण संच (निविदेच्या प्रत्येक पानावर सील व निविदाधारकांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.)** |

३. दरपत्रक (BOQ) : सर्व प्रथम निविदा प्राधिकारणांकडून निविदाधारकांचे तांत्रिक भागाचे दस्तऐवज उघडण्यात येतील आणि दस्तऐवजांची छाननी केल्यानंतर आर्थिक दरपत्रक उघडण्यासाठी पात्र असलेल्या निविदाधारकांची निवड करेल. अन्यथा निविदा अपात्र ठरु शकते. निविदाधारकाने www.mahatender.gov.in वर दिलेल्या BOQ Excel Sheet च्या स्वरुपात ऑनलाईन सादर केले पाहिजे. निविदाधारकाने दरांच्या मागणीतील (BOQ) मध्ये प्रति किलो दराचा कॉलम भरावा.

४. निविदाधारकाकडे कोणत्याही प्रमाणित प्राधिकरणाकडून प्राप्त केलेले वैध डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र DSC असणे आवश्यक आहे.

५. ई-निविदेच्या विहीत वेळापत्रकानुसार तांत्रिक आणि BOQ मध्ये दर ऑनलाईन सादर केली जातील.

६. सर्वोच्च दरांची निविदा रक्कम उध्दृत करणाऱ्या एकापेक्षा जास्त निविदाधारकास / संस्था / फर्म्सना आदेश विभागून देण्याचा अधिकार विद्यापीठाला राहील. (आवश्यक असल्यास त्या आधी खरेदीदाराला विद्यापीठात वाटाघाटीसाठी आमंत्रित केले जावू शकते,

७. निविदाधारकास प्रत्येक टप्प्यासाठी वाटप केलेल्या तारखा आणि वेळा पाळण्याचा सल्ला दिला जातो. निविदाधारकाने नमूद केल्याप्रमाणे सर्व ऑनलाईन कार्य पध्दतीनुसार वेळेचा मागोवा घेतला पाहिजे आणि इलेक्ट्रानिक सिस्टीम टाईम लॉक लागू करते जे हे सुनिश्चत करते की, टेंडर शेडयुलमध्ये परिभाषित केल्यानुसार कोणतीही गतिविधी किंवा व्यवहार सुरु आणि समाप्तीच्या तारखा आणि स्टेजच्या वेळेच्या बाहेर होणार नाहीत.निविदा प्राधिकरणाच्या विवेकबुध्दी नुसार निविदा टप्प्याचे वेळापत्रक वाढविले जावू शकते.

८. वेळापत्रकात ठेवल्या जाणा-या बाबींच्या संख्येत बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

९. दर उध्दृत करण्यासाठी निविदाधारकाने दरांच्या भागात (BOQ मध्ये) नमूद केलेल्या योग्य त्या ठिकाणी दर नमूद केले पाहिजेत. त्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी अथवा को-या पानांवर कुठेही दर नमूद केले जावू नयेत. तसे केल्यास सदर दर ग्राहय धरता येणार नाहीत.

१०. तांत्रिक भागातील (Technical Document) मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता जे निविदाधारक करतील अशाच निविदाधारकांच्या निविदाधारकाचे दरपत्रक (BOQ) उघडायची की उघडायची याचा निर्णय घेण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे आणि या संदर्भात कोणत्याही निविदाधारकाची कोणतीही हरकत घेतली जाणार नाही.

११ सर्वोच्च दराची निविदा स्वीकारण्यास विद्यापीठ बांधील नाही आणि कोणत्याही किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा /रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

(प्रा.दिपक शरदराव दलाल)
प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
कबचौउमि,जळगाव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**Grade-A**
**NAAC ACCREDITED IV$^{rd}$ cycle**

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

अटी व शर्ती : -

१) ई निविदेसोबत बयाणा रक्कम रु.**१,५०,०००/-(अक्षरी रु.एक लाख पन्नास हजार मात्र)** व निविदा **किंमत रु.१५,०००/-(अक्षरी रु.पंधरा हजार मात्र)** नेट बँकींग व्दारे भरणे आवश्यक आहेत. **निविदा शुल्क ना-परतावा व बयाणा रक्कम परत करण्यात येईल.**

२) सुरक्षा अनामत ज्या खरेदीधारकांची ई निविदा स्वीकारली जाईल त्यास रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) सुरक्षा अनामत (बिनव्याजी) डी.डी. धनाकर्षा व्दारे भरावी लागेल.

३) ज्या निविदाधारकाचे दर स्वीकारले जातील त्यांनी दिलेल्या विहीत मुदतीत रद्दी खरेदी करण्यास नकार दिल्यास त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दुस-या खरेदीदारांना सदर रद्दी साहित्य विक्री केले जाईल. सदर व्यवहारात विद्यापीठास आर्थिक नुकसान झाल्यास सदर तुट पहिल्या खरेदीराकडून वसूल केली जाईल.

४) सर्व रद्दी साहित्य विद्यापीठाच्या प्रतिनिधी समोर विद्यापीठ सांगेल त्याप्रमाणे स्वखर्चाने आहे त्या स्थितीत जशीच्या तशी उचलून न्यावयाचे आहे.

**५) उत्तरपत्रिका रद्दी, पेपर मिलमध्ये पल्पींगसाठी वापरावी व तशी हमी करार करतेवेळी रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमी द्यावी लागेल व सदर रद्दी पेपर मिलमध्ये विक्री केल्याबद्दलची दस्तऐवजे संबंधित पेपर मिलचे पल्पींग सर्टिफिकेट विद्यापीठास सादर करावे लागतील. त्याशिवाय सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.**

६) रिकाम्या तसेच रद्दीने भरलेल्या वाहनाचे वजन, विद्यापीठ सांगेल त्या भुईकाटयावर विद्यापीठाच्या प्रतिनिधी समोर संबंधित ठेकेदाराने स्वखर्चाने करावयाचे आहे.

७) रद्दी उचलण्यापूर्वी दोन दिवस अगोदर रद्दीची होणारी अंदाजित रक्कम विद्यापीठ सांगेल त्यानुसार अग्रीम म्हणून धनाकर्ष किंवा बँकर चेकव्दारे विद्यापीठात भरणा करावी लागेल.

८) गोपनीय विचारात घेता कोणत्याही प्रकारची संशयास्पद तक्रार आल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारक (खरेदीदार) यांची असेल म्हणून ठेकेदाराने प्रथमपासून काळजी घेणे आवश्यक आहे.

९) दरपत्रकातील सर्व कर सोडून आहेत, त्यात काहीही करदायित्व असल्यास ते खरेदीदाराकडून वसूल करण्यात येईल.

१०) सदरचे दर BOQ Format मध्येच भरावयाचे आहेत.

११) कोणतेही कारण न देता दरपत्रके स्वीकारण्याचा, फेटाळण्याचा वरील अटीत संपूर्ण किंवा अंशत: बदल करण्याचा अथवा विक्रीसाठी करार केल्यानंतर त्यात बदल करण्याचा किंवा करार संपूष्ठात आणण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

१२) ई-निविदेच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाने निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संमतीदर्शक संपूर्ण सही व शिक्का ठळकपणे नमूद करणे आवश्यक असून संपूर्ण दस्तऐवजांचा संच अपलोड करणे आवश्यक आहे. कुठल्याही प्रकारची खाडाखोड, ओव्हर रायटींग आढळल्यास ई-निविदा अपात्र समजण्यात येईल.

१३) निविदेसोबत ग्राहकाची यादी (List of Client) जोडणे आवश्यक आहे.

१४) निविदेसोबत अधिकृत साक्षांकित दस्तऐवजांच्या प्रती जोडाव्यात,अपूर्ण दस्तऐवज असलेली ई-निविदा नाकारण्यात येईल व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असेल.

१५) विद्यापीठाव्दारा यापुर्वी रद्दी विक्रीचा कार्यादेश देवूनही रद्दी उचलण्याची कार्यवाही न केलेल्या अथवा ज्यांची सुरक्षा अनामत जप्त करण्यात आलेली आहे, अशा पुरवठादारांनी ई-निविदा सादर करु नये.

१६) ई-निविदेत नमूद केलेल्या दस्ताऐवजां व्यतिरिक्त इतर काही दस्तऐवज मागणी केल्यास ते देखील सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**वरील अटी व शर्ती मान्य असणा-या निविदाधारकांनी ई-निविदा Online पध्दतीने सादर करावयाची आहे. तसेच यापूर्वी ज्या निविदाधारकाने विद्यापीठ कार्यादेश स्वीकारुनही कुठल्याही प्रकारचा व्यवहार पूर्ण केलेला नसेल अशा निविदाधारकाच्या (खरेदीदार) निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.**

(प्रा.दिपक शरदराव दलाल)
प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
कबचौउमि,जळगाव

निविदाधारकांची सही व शिक्का

## -: वापरलेल्या उत्तरपत्रिका व कार्यालयीन दस्तऐवजांची अंदाजे व वजननिहाय तक्ता :-

| अ.क्र. | तपशील | टन |
|---|---|---|
| 01 | वापरलेल्या उत्तरपत्रिका | 80 टन (अंदाजित) |
| 02 | प्रश्नपत्रिकांची रॅपर्स | 02 टन (अंदाजित) |
| 03 | पाकीटे | 01 टन (अंदाजित) |
| 04 | वापरलेल्या उत्तरपत्रिकांच्या दुसरी आणि तिसरी स्लीप | 01 टन (अंदाजित) |
| 05 | प्रबंध (Thesis) | 10 टन (अंदाजित) |
| 06 | कार्यालयीन दस्तऐवज | 02 टन (अंदाजित) |
| 07 | पुठ्ठा | 02 टन (अंदाजित) |

**परिशिष्ट-१**

: निविदे सोबत अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी :

| निविदाधारकाची माहिती | | |
|---|---|---|
| 1 | निविदा सुचना संदर्भ व तारीख | जा.क्र. कबचौउमवि/ई-निविदा/ /परीक्षा/वा.उ./ विक्रीची ई-निविदा/2987/2022<br>दिनांक : 02/12/2022 |
| 2 | निविदाधारकाचे (संस्थेचे) नाव व संपूर्ण पत्ता | |
| 3 | दूरध्वनी, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी | |
| 4 | व्यवसायातील अनुभव | |
| 5 | शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशन क्रमांक (स्वाक्षांकित प्रत जोडावी) | |
| 6 | * जी.एस.टी (GST) नोंदणी क्रमांक (स्वाक्षांकित प्रत जोडावी) | |
| 7 | * पॅन क्रमांक (साक्षांकित प्रत जोडावी) | |
| 8 | मागील 03 वर्षाचे आयकर विवरणपत्र (ITR) पत्रके | |
| 9 | निविदा शुल्क व बयाणा रक्कमेचा तपशील | |
| 10 | सध्या कोणकोणत्या संस्थांकडून निविदेतील नमूद साहित्य घेतलेले आहे त्याचा तपशील (सोबत : ग्राहकांची यादी व आदेश जोडावेत. | |

(* चिन्हांकीत रकान्यासाठी सत्यप्रती जोडणे आवश्यक)

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

दिनांक :

**परिशिष्ट-२**

## मागील तीन वर्षाच्या वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | वार्षिक उलाढाल (लाखात) |
|---|---|---|
| १ | २०१९-२० | |
| २ | २०२०-२१ | |
| ३ | २०२१-२२ | |

चार्टर्ड अकाउटंटचा
शिक्का आणि स्वाक्षरी

निविदाधारक अधिकृत प्रतिनिधीचा
शिक्का व स्वाक्षरी

**: काळया यादीत टाकण्याबाबत / निविदेत भाग घेण्यास प्रतिबंधित करण्याबाबत घोषणा :**

पब्लिक नोटरी / कार्यकारी अधिकारी याव्दारे रु.२००/-नॉन ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर निविदाधारकाने आमंलात आणणे व साक्षांकित करणे.

मी आम्ही ----------------------------- उत्पादन / भागीदार /अधिकृत वितरक मे. चे एजंट ---------------------------------------------------------------------- या व्दारे घोषणा करतो की, फर्म / कंपनी म्हणजे ----------------------------------------- भूतकाळात काळया यादीत टाकले गेले नाही किंवा प्रतिबंधित केले गेले नाही. केंद्र / राज्य सरकार किंवा शासनमान्य अनुदान पात्र इतर कोणत्याही संस्थेव्दारे निविदांमध्ये भाग घेण्यास आमच्या संस्थेस प्रतिबंधित केलेले नाही.

वरील माहिती खोटी आढळल्यास आम्हाला / मला पूर्ण माहिती आहे की, विद्यापीठाकडून निविदा करार नाकारला जाईल / रद्द केला जाईल आणि बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल,याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी :--------------------------------

नाव : ----------------------------------

पत्ता :-----------------------------------

कंपनी / फर्मचे नाव : ---------------------

प्रमाणित :

पब्लिक नोटरी / कार्यकारी अधिकारी

परिशिष्ट-४

# लेटरहेडवर निविदाराचे घोषणा पत्र

ई-निविदा

वापरलेल्या उत्तरपत्रिका आणि इतर अधिकृत दस्तऐवजांसाठी ई-निविदा

जा.क्र. :**कबचौउमवि/ई-निविदा /परीक्षा/वा.उ.विक्रीची ई-निविदा/२९८७/२०२२**

मी याव्दारे प्रमाणित करतो की, मी निविदेत दस्तऐवजात नमूद केलेली सर्व माहिती आणि अटी व शर्तींचे पालन केले आहे आणि या व्दारे त्याचे पालन करण्याची पुष्टी करतो. मी या व्दारे हे देखील प्रमाणित करतो की, ई निविदेतील दरांच्या भागामध्ये (BOQ) नमूद केलेले दर इतर कोणत्याही संस्थेला आकारलेल्या दरापेक्षा जास्त नाहीत.

स्वाक्षरी : -----------------------------------

स्वाक्षरी करणाऱ्याचे नाव : ----------------------

निविदाधारकाचा शिक्का :----------------------